### लवकरच मेट्रो गाडीची चाचणी घेण्यात येणार

# मेट्रो डब्यांची यशस्वी जुळवणी

मुंबई, ता. ९ : बहुप्रतीक्षित कुलाबा ते सीप्झ मेट्रो- ३ मार्गासाठी आठ डब्यांची पहिली प्रोटोटाईप ट्रेन बॅटरीचलित शन्टरने यशस्वीपणे जोडण्यात आली आहे. लवकरच आता या मेट्रो गाडीची चाचणी घेण्यात येणार असल्याची माहिती मुंबई मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशनने (एमएमआरसी) दिली आहे.

एमएमआरसीच्या कार डेपोसाठी केलेली ही पहिली खरेदी. या शन्टरने एमएमआरसीद्वारे सारीपूतनगर, आरे येथे ट्रेन डिलिव्हरी आणि चाचणी ट्रेकसाठी उभारलेल्या तात्पुरत्या सुविधेमध्ये पहिल्या आठ डब्यांच्या ट्रेनची जुळवणी केली. या छोट्या अद्भुत शन्टरची क्षमता ३५० टन वजन खेचण्याची आहे. बॅटरी पूर्णपणे चार्ज असताना हे शन्टर आठ डब्यांची ट्रेन ९ किमीपर्यंत खेचू शकते. तसेच हे शन्टर सतत ५० किलो न्यूटन क्षमतेने काम करू शकते. या शन्टरची त्याच्या स्वयंचलित कप्लर तसेच अर्धस्थायी कप्लर अडॉप्टरसह यशस्वीरीत्या चाचणी करण्यात आली. दोन्ही कप्लर मेट्रो डबे जोडण्यासाठी वापरले जातात.



## नेदरलँड्सच्या एनआयटीईक्यूकडून निर्मिती

ठाणे येथील मे. रेनमॅक इंडिया प्रा. लि. यांनी नेदरलँड्सच्या एनआयटीईक्यू संस्थेसोबतच्या संयुक्त उपक्रम आणि तंत्रज्ञान हस्तांतरण करारांतर्गत मेक-इन-इंडियाच्या धोरणाचा एक भाग म्हणून या रेल कम रोड शन्टरची पूर्णपणे निर्मिती केली आहे, अशी माहिती मुंबई मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशनने (एमएमआरसी) दिली आहे.